**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता नवीन महाविद्यालयास इरादापत्र देणेबाबत.**
**(न्यायालयीन प्रकरण)**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-८६८०५८/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २२ एप्रिल,२०२६

**संदर्भ:**-१. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.मान्यता-२०२५/ ई- ८४०७८३/ मशि-४, दि. १८.०९.२०२५.
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र.६७९८/ २०२४ मधील मा. न्यायालयाचे दिनांक १८.०९.२०२५ रोजीचे आदेश.

**प्रस्तावना:-**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता समाज विकास बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, कोल्हा, ता. मुदखेड, जि. नांदेड या संस्थेच्या वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड या नवीन प्रस्तावित महाविद्यालयास इरादापत्र नांमजूर करण्यात आल्यामुळे संबंधित संस्थेने मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ६७९८/२०२४ दाखल केली होती. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक १८.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता समाज विकास बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, कोल्हा, ता. मुदखेड, जि. नांदेड या संस्थेच्या वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड या महाविद्यालयास इरादापत्र देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

याचिका क्रमांक ६७९८/२०२४ या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक १८.०९.२०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड या बिंदू करिता याचिकादार समाज विकास बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, कोल्हा, ता. मुदखेड, जि. नांदेड या संस्थेच्या वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड या नवीन प्रस्तावित महाविद्यालयास खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (घ) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम विना अनुदान तत्वावर इरादापत्र मंजूर करण्यात येत आहे :-

| स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव** | **विद्याशाखा** |
| १. | समाज विकास बहुउद्देशिय सेवाभावी संस्था,कोल्हा, संचलित वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड | कला (बी.ए.), वाणिज्य (बी. कॉम) व विज्ञान (बी.एस्सी ) |

## २. अटी व शर्ती:-

उपरोक्त इरादापत्रांकरीता पुढीलप्रमाणे **अटी व शर्ती** लागू राहतील :-

१) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे **कायम विनाअनुदानित तत्वावर** महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२) सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (ङ) नुसार शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता देण्यात आलेले इरादापत्र **दिनांक ३१ जानेवारी, २०२७ पर्यंत वैध** असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल अंतिम मान्यता मिळण्याकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह विद्यापीठास नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS) द्वारे सादर करणे अनिवार्य राहील.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमामध्ये आणि शासन निर्णय दिनांक १८.०९.२०२५ अन्वये अंतिम मान्यतेची कार्यपध्दती स्पष्टपणे विशद करण्यात आलेली आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार व सदर कार्यपद्धतीनुसार इरादापत्र प्राप्त संस्था इरादापत्राच्या अटी व शर्ती पूर्ण करतात, त्यांनी विद्यापीठाकडे अंतिम मान्यतेसाठी नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS) द्वारे अर्ज करावा व विद्यापीठांनी सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज व त्यासोबतचा अनुपालन अहवाल मंजुरीच्या शिफारशींसह नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS) द्वारे शासनाकडे सादर करावा.

४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (च) अंतर्गत परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादापत्रातील शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करेल तर, इरादापत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

५) सदर महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

६) सदर महाविद्यालयास वरील विवरणात नमूद अभ्यासक्रमांचे महाविद्यालय सुरु करण्यास इरादापत्र हे संबधित विद्यापीठातील अधिकृत अभ्यासक्रम असल्याच्या धारणेतून देण्यात येत आहे. विद्यापीठाने याबाबत खातरजमा करावी.

७) महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत इरादापत्राच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. अशाप्रकारे प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास यासंदर्भातील कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व इरादापत्र रद्द करण्यात येईल.

८) महाविद्यालयामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करताना **The Rights of Persons with Disabilities Act, २०१६** मधील तरतुदीनुसार तसेच या संदर्भातील वेळोवेळी विहित केलेल्या निकषानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील याची खातरजमा करण्यात यावी व अंतिम मान्यतेकरिता पूर्तता अहवाल सादर करतांना या संदर्भातील प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

९) राज्य क्रीडा व युवा धोरण, २०१२ च्या अंमलबजावणीसंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण, शासन निर्णय, दिनांक २५.०७.२०१३ मधील बाबींचे पालन करणे अनिवार्य राहील.

**३.** विद्यापीठाने अंतिम मान्यता देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करताना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित कार्यपद्धती व निकषांचे पालन करावे.

**४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२२१४४८३७८००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.04.22 14:49:32 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,
१०. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती,
११. उपसचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१२. संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत),
१३. निवडनस्ती (मशि-४).